343

<u>भाडेरहित निवासस्थानाऐवजी
घरभाडे भत्ता मंजूर करणे --</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
निर्णय क्रमांक सीपीए-१४८०/सीआर-३३३/एसईआर-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च १९८०. CR1980031501

<u>पहा</u> :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७१/१७७१/एस-३,
दिनांक २१/४/७२,

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७८/सीआर-२५१/एसईआर-५,
दिनांक १७-४-७८.

<u>निर्णय</u> :- जे शासकीय कर्मचारी सेवाशर्तीनुसार, भाडेरहित निवासस्थान मिळण्यास पात्र आहेत, पण ज्यांना शासनाकडून निवासस्थाने पुरविण्यात आलेली नाहीत, अशा कर्मचाऱ्यांना, त्याऐवजी किती घरभाडे भत्ता द्यावा ह्याचे सूत्र शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७१/१७७१/एस-३, दिनांक २१-४-७२ व्दारे निर्धारित करण्यात आलेले असून, घरभाड्याची रक्कम प्रत्यक्ष भाड्याइतकी मर्यादित करण्यात आलेली आहे. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७८/सीआर-२५१/एसईआर-५, दिनांक १७-४-७८ अन्वये, दरमहा रुपये ७५० पर्यंत मूळ वेतन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना ते प्रत्यक्षात किती भाडे देतात ह्याची भाडेपावतीवरुन पडताळणी न करता, विहीत दराने घरभाडे भत्ता देण्याची सवलत देण्यात आली आहे. अशाच प्रकारची सवलत भाडेरहित निवासस्थानाऐवजीच्या घरभाडे भत्त्यासाठीही देण्याचा प्रश्न शासनाचे विचाराधीन होता. त्याबाबत, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७१/१७७०/एस-३, दिनांक २१-४-७२ च्या आदेशांत अंशतः सुधारणा करण्याचे ठरवून, शासन असा आदेश देत आहे की, जे शासकीय कर्मचारी, सेवाशर्तीनुसार भाडेरहित निवासस्थान मिळण्यास पात्र आहेत पण ज्यांना शासन निवासस्थान पुरविता आलेले नाही, अशा कर्मचाऱ्यांना, त्याऐवजी खाली दर्शविल्याप्रमाणे घरभाडे भत्ता देण्यात यावा :-

<u>एक</u> :-

| | |
|---|---|
| ज्या ठिकाणी सर्वसाधारण घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. | प्रत्यक्ष भरलेल्या भाड्याची रक्कम <u>अथवा</u> वेतनाच्या १० टक्के इतकी रक्कम ह्यापैकी जी कमी असेल ती रक्कम. |

<u>दोन</u> :-

| | |
|---|---|
| ज्या ठिकाणी सर्वसाधारण घरभाडे भत्ता अनुज्ञेय आहे, व - | प्रत्यक्ष भरलेल्या भाड्याची रक्कम <u>अथवा</u> |
| अ) शासकीय कर्मचाऱ्याचे दरमहा मूळ वेतन रु. ७५० पेक्षा जास्त आहे. | वेतनाच्या १० टक्के इतकी रक्कम अधिक शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७८/सीआर-२५१/एसईआर-५ मधील कोष्टक दोन प्रमाणे किंवा त्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलाप्रमाणे, अनुज्ञेय असलेला घरभाडे भत्ता, ह्यातील कमी असेल ती रक्कम. |

एच-१४२३(७०००+५-४-८०)

| | |
|---|---|
| ब) शासकीय कर्मचाऱ्याचे दरमहा मूळ वेतन ७७५० पेक्षा कमी आहे. | वेतनाच्या १० टक्के इतकी रक्कम भाडेपावतीची पडताळणी न करता अनुज्ञेय असलेला घरभाडे भत्ता. |

भाडेरहीत निवासस्थानाऐवजी घरभाडेभत्ता मिळण्यासाठीच्या इतर अटी पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.
२. हे आदेश दिनांक १/१/१९८० पासून अंमलात असतील.
३. ह्या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

श्रीमती एस. व्ही. पंडित,
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग.

प्रति
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य).
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्र्यांचे व राज्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक.
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक-आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*वरिष्ठ उपसंचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतूक, लेखा परीक्षा मंडल, मुंबई.
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
मंत्रालयाचे सर्व विभाग.
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी.
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

---------

* पत्राद्वारे

K.W.P.C

क्रमांक दिनांक
यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म. रा.), पुणे यांचेकरिता.